# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*

ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - http://mumbai.dte.org.in


क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३ व ४/२०१२/1571
दिनांक 14 JUN 2012

प्रति,
प्राचार्य,
शासकिय/अशासकिय अनुदानित/
विनाअनुदानित पदवीका/पदवी,
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारणी करणा-या संस्थांवर कारवाई करण्याबाबत

संदर्भ :- १.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/ २०१२/ ११४५ दि.१२ जुन २०१२
२. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएस २००४/(५४५/०४) /तांशि-१ दिनांक ११.१.२००५

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया सरु होत आहे. तदअनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांचे जे शिक्षण शुल्क राज्याच्या शिक्षण शुल्क समितीने जाहीर केलेले आहे त्या निर्धारीत केलेल्या शुल्क तसेच विद्यापीठाने ठरविलेले परीक्षा व एनरॉलमेंट फी या व्यतिरिक्त कुठलेही शुल्क आकरण्यात येऊ नये असे सदर्भ क्र २ च्या शासन निर्णया अन्वये कळविलेले आहे.(सोबत शासन निर्णयाची प्रत) तदअनुषंगाने संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये कळविल्या प्रमाणे एखादी संस्था विहीत शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारत असेल व त्यासंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणुन समजण्यात येईल अशी जास्तीचे शिक्षण शुल्क आकारलेल्या संस्थावर सदर शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येईल. (सोबत सदंर्भीय पत्र क्र. १ च्या पत्राची प्रत)

(जी.बी.धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी – ३०३३३४४७ /४२२/४९१ फॅक्स -२२६९ २१०२/२२६९००७

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


महत्वाचे

क्रमांकः २अ/एडीएम/२०१२/७१४५

दिनांक 12 JUN 2012

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारणी करणा-या संस्थांवर कारवाई करणेबाबत....

संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम २००४/(५४५/०४)/तांशि-१ दिनांक ११.१.२००५

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया सुरू होत आहे. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांचे जे शिक्षण शुल्क राज्याच्या शिक्षण शुल्क समितीने जाहीर केलेले आहे त्या निर्धारीत केलेल्या शुल्क तसेच विद्यापीठाने ठरविलेले परीक्षा व एनरॉलमेंट फी या व्यतिरिक्त संस्थांनी कुठलेही शुल्क आकारू नये असे संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाने कळविलेले आहे. तसेच एखादी संस्था विहीत शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारत असेल व त्यासंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणून समजण्यात येईल व त्यासंबंधी महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ) ॲक्ट १९८७ नुसार संबंधित संस्थांची तपासणी करण्याची व त्यात संस्था दोषी आढळल्यास त्यावर कारवाई करण्याच्या तरतूदी संदर्भाधीन शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे )

सदर शासन निर्णयातील तरतूदींचा विचार करून आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांबाबत विहीत शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारण्याची तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर आपण कार्यवाही करावी

( डॉ. सुभाष महाजन )

प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\2012-13\Gen Correspondence\Anti Capitation ACT letter to RO.doc

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक शिक्षण संस्थांतर्गत येणा-या अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारणी करणा-या शिक्षण संस्थांची / महाविद्यालयांची "महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन" (प्रोहिबीशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ अंतर्गत तपासणी व त्यांच्यावरील कारवाई बाबत.-

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२००४/(५४५/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११जानेवारी २००५

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.युएसजी-२००३/(८५/०३)/विशि-४, दि.२४ सप्टेंबर,२००३
२) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.१०(२)/एनडीजी/एडीएम/२००३/१२४१, दि.१९.९.२००३ ची जाहीर नोटीस.
३) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची क्र.१०/एडीजी/शिक्षण शुल्क/२००४/८६९, दि.१५ जुलै,२००४ ची जाहीर नोटी (प्रेस नोट)
४) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.१०/एडीएम/२००४/१५१०, दि.१५ सप्टेंबर २००४ चे पत्र.
५) मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२२/९/२००४ रोजी याचिका क्र. ३५६/२००४ व इतर याचिका व विशेष अनुज्ञा याचिका क्र. १७४६४/२००४ व इतर विशेष अनुज्ञा याचिकेवर दिलेला निकाल.

प्रस्तावना :- टि.एम.ए.पै. फौंडेशन व इतर विरुध्द कर्नाटक राज्य व इतर या न्यायालयीन प्रकरणी (याचिका क्र.३१७/१९९३ व अन्य) तसेच इस्मालिक ॲकेडमी ऑफ एज्युकेशन व इतर या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. ३१/१०/२००२ व १४.८.२००३ रोजी दिलेल्या निकालानुसार राज्यातील सर्व खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी ठरविलेल्या व लागू केलेल्या शिक्षण शुल्काची रितसर तपासणी / छाननी करुन प्रमाणित करण्यासाठी तथा अंतिम शुल्क ठरविण्यासाठी शासनाने संदर्भ क्र.(१) मध्ये नमूद केलेल्या दि.२४.९.२००३ च्या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली "शिक्षण शुल्क समिती" स्थापन केली आहे.

२. त्याप्रमाणे सदर शिक्षण शुल्क समितीने सन २००३-०४ पासून राज्यातील विविध खाजगी संस्थांमधील अभियांत्रिकी व इतर अभ्यासक्रमांसाठी संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय शिक्षण शुल्क निश्चित केले आहे. शिक्षण शुल्क निश्चित करतांना, संस्थेकडून विहित निकषानुसार संबंधित अभ्यासक्रमासाठी येणारा खर्च व विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सुविधा याबाबींचा समितीने विचार केला आहे.

३. त्या अनुषंगाने शासनाच्या वतीने संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भ क्र.(२) व (३) येथील जाहीर नोटीसीद्वारे पुढीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत."--

अ) " शिक्षण शुल्क समितीने खाजगी विना अनुदानित संस्थांमधील व्यावसायिक पदवी / पदविका अभ्यासक्रमाचे जे शिक्षण शुल्क जाहीर केलेले आहे त्या निर्धारीत केलेल्या शुल्काच्या व्यतिरिक्त

...ी कुठलेही शुल्क आकारु नये. तथापी, विद्यापीठाने ठरविलेले परिक्षा व एनरॉलमेंट फी घेण्याची मु...ील."

ब) " एखादी संस्था विहीत शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारत असेल व त्यासंबंधी तंत्रशिक्षण संचालनालयास अथवा विभागीय कार्यालयास तक्रार प्राप्त झाल्यास सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणून समजण्यात येईल व आपल्या संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी."

शिक्षण शुल्क समितीने अंतीमतः विहीत शुल्क ठरवून देऊन ते लागू करण्यास मान्यता दिली असतांना व संचालक, तंत्रशिक्षण यांनी वरीलप्रमाणे सूचना देऊनही खाजगी व्यावसायिक /तांत्रिक व शिक्षण शास्त्र अभ्यासक्रम चालविणा-या काही शिक्षण संस्था शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेल्या शुल्कापेक्षाही अधिकचे शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

शासनाने याची गंभीर दखल घेतली असून, अशा प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार " महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबीशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ " अंतर्गत संबंधीत संस्थांची तपासणी करण्याची व त्यात संस्था दोषी आढळल्यास त्यावर कारवाई करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : वरीलप्रमाणे प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबीस अनुसरुन शासन आता या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देत आहे :-

प्रत्येक विद्यार्थ्यांकडून संस्थेने /महाविद्यालयने पुढीलप्रमाणे शिक्षण शुल्क आकारावे.

१) शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेले शिक्षणशुल्क

२) विद्यापीठामार्फत आकारण्यात येणारे नोंदणी शुल्क (रजिस्ट्रेशन फी ) व परिक्षा शुल्क (एक्झामिनेशन फी )

३) ज्या संस्थेत वसतीगृह व भोजन व्यवस्था उपलब्ध आहे, व त्यात ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असेल त्यांना त्या साठीचे वसतीगृह शुल्क.

या व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे शुल्क संस्था स्तरावर आकारण्यात येऊ नये.

- जर एखाद्या संस्थेने कोणत्याही कारणास्तव उपरोक्त नमूद केलेल्या शुल्का व्यतिरिक्त अधिकचे शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क आकारले असले तर सदर अधिकची रककम विद्यार्थ्यांना परत करणे संस्थांना बंधनकारक राहील.
- सदर शुल्क परत करतांना ते रोख रकमेच्या स्वरुपात परत करण्यात येईल

किंवा

- पुढील वर्षाच्या शुल्कामध्ये समायोजित करण्यात येईल अशा आशयाचे लेखी हमीपत्र संस्थेमार्फत विद्यार्थ्याला देण्यात येईल.
- सदर आदेश ज्या शैक्षणिक वर्षापासून शिक्षण शुल्क समितीने शिक्षण शुल्क निश्चित केले आहेत त्या वर्षापासून लागू राहील.

उपरोक्त कार्यवाही संबंधित संस्थेने प्रतिवर्षी डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावयाची आहे.

२. जर संस्थानी उपरोक्त कार्यवाही डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण केली नाही तर अशा संस्थांविरुध्द महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबीशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ च्या कलम (३) च्या कलम (३) व (४) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

याकरिता संस्थांची तपासणी करुन त्याचा तपासणी अहवाल शासनास सादर करण्याकरीता याच कायदयाच्या कलम ६ च्या उपकलम (१) मधील तरतुदीनुसार संबंधीत विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण /उच्च शिक्षण यांची " तपासणी अधिकारी " म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे :-

(१) शासनाच्या वतीने सदर तपासणी अधिका-यास कलम (६) मधील तरतुदीनुसार शैक्षणिक शुल्का संबंधी आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी करता येईल तसेच शुल्काच्या तक्रारीची शहानिशा करतांना कलम (४) मधील तरतुदीनुसार विहीत शिक्षण शुल्क विषयक बाबींची खात्री करता येईल

(२) याप्रमाणे विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण / उच्च शिक्षण तथा " तपासणी अधिकारी " यांच्याकडून शासनास तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर जर त्यात संस्था दोषी आढळल्यास संबंधीत संस्थेविरुध्द शासन स्तरावर प्रथम कलम ३ मधील उपकलम (३) च्या पोटकलम (ए) व (बी) व उपकलम (४) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) तसेच वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस सदर कायदयाच्या कलम (११) नुसार शासनाच्या / शासनाच्या तपासणी अधिका-याच्या विरोधात कोणताही दावा खटला किंवा इतर कोणतीही कारवाई दाखल करता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( मनीषा शिंत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५
मा.कुलगुरु / कुलसचिव (सर्व अकृषी विद्यापीठे )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, कलाशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण )संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक,प्रशिक्षण ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण , विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / अमरावती/नाशिक
सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण
सर्व व्यावसायिक शिक्षण संस्थांना (संचालक, तंत्रशिक्षण /उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
कार्यासन सचिव शिक्षण शुल्क समिती व प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्र निकेतन वांद्रा(पूर्व)मुंबई-५१.
मा.मंत्री, तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री, उच्च शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक , मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, (वैद्यकीय शिक्षण) मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
विभागातील सर्व उपसचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती (तांशि-१)